**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि व्हेनेझुएलाच्या प्रभारी राष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज यांच्यात द्विपक्षीय चर्चा

- डोनाल्ड ट्रम्प यांना इराणमध्ये पुढली लष्करी कारवाई करण्यापासून रोखण्यासाठी अमेरिकेच्या संसदेत ठराव मंजूर

- संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे अस्थायी सदस्य म्हणून ऑस्ट्रिया, किर्गिस्तान, पोर्तुगाल, त्रिनिदाद - टोबॅगो, आणि झिम्बाब्वे या देशांची निवड

- मोसमी पावसाचं केरळात आगमन

- 'पहिली जागतिक योगासन क्रीडा स्पर्धा 2026' आजपासून अहमदाबाद इथं सुरु होणार

**आणि**

- प्रसिद्ध चित्रपट निर्माते दिग्दर्शक आणि चित्रपट प्रमाणन मंडळाचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचं आज मुंबईत निधन

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि व्हेनेझुएलाच्या प्रभारी राष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज यांच्यात आज नवी दिल्ली इथं बैठक सुरू आहे. ऊर्जा सुरक्षा, व्यापार आणि गुंतवणूक, औषधनिर्माण, आरोग्य सेवा, नवीकरणीय ऊर्जा आदी क्षेत्रातील सहकार्याविषयी या बैठकीत दोन्ही नेते चर्चा करतील.

त्याआधी डेल्सी रॉड्रिग्ज यांनी परारष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली. त्यांच्या भारत भेटीमुळे दोन्ही देशातले संबंध अधिक बळकट होतील अशी आशा जयशंकर यांनी व्यक्त केली.

डेल्सी रॉड्रिग्ज यांचं पाच दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी काल नवी दिल्ली इथं आगमन झालं. त्यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळात व्हेनेझुएलाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री, अर्थ मंत्री, विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्र्यांचा समावेश आहे. व्हेनेझुएलाचं शिष्टमंडळ ऊर्जा, औषधनिर्माण

आणि वाहन क्षेत्राशी संबंधित ठिकाणांना भेट देणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी सांगितलं.

भारत आणि व्हेनेझुएला हे ऊर्जा क्षेत्रातले महत्त्वाचे भागीदार असून भारतातल्या सार्वजनिक क्षेत्राने व्हेनेझुएलाच्या ऊर्जा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. या भेटीमुळे हे संबंध दृढ होण्याची अपेक्षा आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना इराणमध्ये पुढली लष्करी कारवाई करण्यापासून रोखण्यासाठी अमेरिकेच्या संसदेने एक ठराव मंजूर केला आहे. चार रिपब्लिकन सदस्यांनी डेमोक्रॅट्सना साथ दिल्यानंतर, २१५ विरुद्ध २०८ मतांनी हा ठराव मंजूर झाला. इस्राएल आणि अमेरिकेने गेल्या फेब्रुवारीपासून इराणमध्ये छेडलेल्या युद्धावरून अमेरिकन संसदेत नाराजी उमटत असून, ट्रम्प यांच्या युद्धखोरीवर नियंत्रण मिळवण्याचा अमेरिकन संसदेचा हा चौथा प्रयत्न आहे. मात्र रिपब्लिकन पक्षाच्या नियंत्रणाखाली असलेल्या अमेरिकन प्रतिनिधीगृहात अद्याप त्याला मंजुरी मिळाली नाही.

**<><><><><>**

इस्राएल आणि लेबनॉन यांच्यात परस्परांबरोबरचा शस्त्रसंधी आणखी वाढवण्यावर, तसंच लेबनॉनमध्ये प्रायोगिक तत्वावर अनेक सुरक्षा क्षेत्र निर्माण करण्यावर सहमती झाली आहे. हिजबुल्लाहच्या दहशतवाद्यांना या क्षेत्रात प्रवेश करायला बंदी असेल. या सुरक्षा क्षेत्रांचा संपूर्ण ताबा लेबनीज सैन्यानं घ्यावा, अशी तरतूद या करारात करण्यात आली असून, या उपायांमुळे सर्वसमावेशक शांतता आणि सुरक्षा कराराच्या दिशेनं प्रगती शक्य होईल, अशी अपेक्षा आहे.

दरम्यान, हिजबोल्ला गटानं गोळीबार पूर्णपणे थांबवल्यावर आणि लिटानी नदीच्या दक्षिणेकडच्या भागातून माघार घेतल्यावरच हा शस्त्रसंधी लागू होईल, असं अमेरिकेच्या मध्यस्थीनं पार पडलेल्या चर्चेच्या चौथ्या फेरीनंतर जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेनं ऑस्ट्रिया, किर्गिस्तान, पोर्तुगाल, त्रिनिदाद आणि टोबॅगो, तसंच झिम्बाब्वे या पाच देशांची संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे अस्थायी सदस्य म्हणून

दोन वर्षांच्या कार्यकाळासाठी निवड केली आहे. हे देश १ जानेवारी २०२७ रोजी आपला कार्यभार स्वीकारतील आणि ३१ डिसेंबर २०२८ पर्यंत कार्यरत राहतील. नव्यानं निवड झालेले देश, डेन्मार्क, ग्रीस, पाकिस्तान, पनामा आणि सोमालिया या अस्थायी सदस्य देशांची जागा घेतील.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचं अस्थायी सदस्यत्व मिळवण्यासाठी उमेदवार देशाला संयुक्त राष्ट्र सर्वसाधारण सभेत उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्य देशांपैकी दोन-तृतीयांश सदस्यांचा पाठिंबा मिळवणं आवश्यक आहे.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत १५ सदस्य आहेत. ब्रिटन, चीन, फ्रान्स, रशिया आणि अमेरिका हे स्थायी सदस्य आहेत, तर १० अस्थायी सदस्य वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशांमधून निवडले जातात. यापैकी ५ सदस्यांची दर वर्षी नव्यानं निवड होते.

<><><><>

ब्रिक्स सांस्कृतिक कार्यगटाच्या दुसऱ्या बैठकीचं आयोजन उत्तरप्रदेशात वाराणसी इथं करण्यात आलं आहे. आज आणि उद्या होणाऱ्या या बैठकीत चीन, ब्राझील, इजिप्त, इथिओपिया आणि इंडोनेशियासह ११ देशांचे प्रतिनिधी सहभागी होतील. या बैठकीत वरिष्ठ मुत्सद्दी, धोरणकर्ते आणि सांस्कृतिक क्षेत्रातले तज्ज्ञ चर्चा करतील. तसंच या बैठकीदरम्यान, वाराणसी इथल्या जगप्रसिद्ध 'जी आय-टॅग' प्राप्त उत्पादनांचं एक विशेष प्रदर्शनही आयोजित करण्यात आलं आहे.

<><><><>

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज मेघालयात शिलॉन्ग इथं ईशान्येकडच्या राज्यांची ७३ वी परिषद सुरु झाली. या परिषदेत ईशान्येकडच्या राज्यांमधल्या विकासाबाबतच्या विविध मुद्यांवर चर्चा होईल. पायाभूत सुविधा विकास, शेती, बगीचे, क्रीडा, पर्यटन, गुंतवणूक, संपर्क साधनांचा विकास, हस्तशिल्प यासारख्या विविध क्षेत्रांचा यात समावेश आहे. या परिषदेत ईशान्य भारत विकास व्हीजन २०४७ बाबत ही चर्चा होईल. या परिषदेत ईशान्येकडच्या ७ राज्यांचे राज्यपाल, मुख्यमंत्री तसच केंद्र आणि राज्यं सरकारांचे अधिकारी सहभागी झाले आहेत .

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज संध्याकाळी दोन दिवसांच्या त्रिपुरा दौऱ्यावर जात आहेत.

**<><><><><>**

नैऋत्य मोसमी पावसाचं आज केरळमध्ये आगमन झाल्याची माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिली आहे. "नैऋत्य मोसमी पावसाची आज, नैऋत्य आणि आग्नेय अरबी समुद्राच्या उर्वरित भागांमध्ये, पश्चिम-मध्य आणि पूर्व-मध्य अरबी समुद्राच्या काही भागांमध्ये, संपूर्ण लक्षद्वीप बेटांवर, केरळ आणि माहे, कर्नाटक आणि तामिळनाडूच्या काही भागांमध्ये, कोमोरिन परिसराच्या उर्वरित भागांमध्ये, आग्नेय बंगालच्या उपसागरात आणि नैऋत्य, पश्चिम-मध्य, पूर्व-मध्य आणि ईशान्य बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांमध्ये आगेकूच केली आहे."

यापूर्वी, हवामान विभागाने २६ मे रोजी केरळमध्ये मोसमी पावसाला सुरुवात होईल असा अंदाज वर्तवला होता; मात्र पावसाच्या आगमनाला विलंब झाला.

**<><><><><>**

वातावरणातल्या अल निनोच्या प्रभावामुळे यंदा आशिया खंडातल्या देशांमधे उष्ण आणि कोरडं तापमान आणि कमी पावसाचा अंदाज असून यामुळे पेरणीचं क्षेत्र घटण्याची शक्यता कृषी तज्ज्ञांनी वर्तवली आहे. भारतातला वायव्य भाग, ऑस्ट्रेलियाचा गहू पट्टा, थायलंडचा तांदूळ पट्टा ते इंडोनेशियातल्या पाम शेतीवर याचा परिणाम होईल असा अंदाज आहे.

**<><><><><>**

'पहिली जागतिक योगासन क्रीडा स्पर्धा 2026' आज गुजरातमधे अहमदाबाद इथं आज सुरु होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या उद्घाटनाच्या कार्यक्रमात दूरस्थ पद्धतीनं सहभागी होतील. या स्पर्धा योगासनांच्या जागतिक क्रीडा वाटचालीतला एक महत्वाचा टप्पा असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी म्हटलं आहे. स्पर्धेचे आयोजक आणि स्पर्धकांना त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून शुभेच्छा दिल्या आहेत. येत्या ८ जून पर्यंत या स्पर्धा चालणार असून, आशिया, युरोप, अमेरिका, आफ्रिका आणि ओशियानीयामधल्या सुमारे ७० ते ७५ देशातले ५०० पेक्षा जास्त योगपटू यात सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

भारतात बंदी असलेल्या 'बर्मीज सुपारी'च्या सीमापार तस्करीचं जाळं उध्वस्त करण्यासाठी, ईडी, अर्थात सक्तवसुली संचालनालयानं आज ईशान्य भारतात मिझोराम मध्ये

चंफाई या म्यांमा सीमेवरच्या शहरात मोठी शोध मोहीम राबवली. तस्करीच्या जाळ्यात सहभागी असलेल्या स्थानिक संशयित व्यक्तींच्या निवासस्थानांवर  ईडी नं छापे टाकले.

या व्यक्तींनी टियू नदीमार्गे म्यांमा मधून बेकायदेशीरपणे बर्मीज सुपारी’ची तस्करी केली, स्थानिक गोदामांमध्ये ती साठवली, आणि बनावट ई-वे बिलं आणि खोट्या कागदपत्रांचा वापर करून ती कायदेशीर स्थानिक खरेदी असल्याचं भासवलं असा ईडी चा आरोप आहे.

**<><><><><>**

प्रसिद्ध चित्रपट निर्माते दिग्दर्शक आणि चित्रपट प्रमाणन मंडळाचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचं आज मुंबईत निधन झालं. ते ७६ वर्षांचे होते.

हथकडी या पहिल्या चित्रपटानंतर त्यांनी २१ हिंदी चित्रपट बनवले. २०१५ ते २०१७ या काळात ते सेन्सॉरबोर्डाचे अध्यक्ष होते. तसंच त्यापूर्वी २९ वर्षं असोसिएशन ऑफ  पिक्चर्स अँड टिव्ही प्रोग्राम प्रोड्यूसर्स या संघटनेचे अध्यक्ष होते. २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी नरेंद्र मोदी यांच्या समर्थनार्थ त्यांनी हर हर मोदी, घर घर मोदी ही यू ट्यूब चित्रफीत बनवली होती.

**<><><><><>**

बिहारमध्ये, मुझफ्फरपूर इथं ब्रह्मपुरा परिसरातल्या एका खासगी रुग्णालयात काल रात्री लागलेल्या आगीत तीन जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. जखमींची प्रकृती गंभीर असून, त्यांना उपचारांसाठी इतर रुग्णालयांमध्ये हलवण्यात आल्याचं स्थानिक प्रशासनानं सांगितलं. रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याची माहिती रुग्णालय प्रशासनानं दिली.

**//<><><><><>//**